ePaper


## महाराष्ट्रावर अतिमुसळधार पावसाचं संकट; 18 जिल्ह्यांना हाय अलर्ट!

| वर्ष - 8 | अंक - 276 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™



www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 9 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## भारतावर हल्ल्याची खुमखुमी पाकला भोवली

# बाप बाप होता है!

## पाकच्या हल्ल्यानंतर भारताकडून करारा जवाब; जल-थल-आकाश पाकिस्तानवर जबर घणाघात

**। नवी दिल्ली । महाईन्यूज**

**भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर चवताळलेल्या पाकिस्तानकडून भारतावर अयशस्वी हल्ल्याच्या प्रयत्न केला जात आहे. परंतु भारतीय लष्कराने पाकिस्तानला जोरदार उत्तर दिले आहे. भारताच्या ऑपरेशन सिंदूरमुळे चिडलेल्या पाकिस्तानने ८ आणि ९ मे च्या रात्री सीमेपलीकडून रात्रभर गोळीबार केला. क्षेपणास्त्र डागण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानचे सात क्षेपणास्त्र भारताने पाडले आहे. भारतीय लष्कराने पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले आहे. गुरुवारी संध्याकाळी जम्मूच्या सीमावर्ती भागात पाकिस्तानने डागलेले किमान आठ क्षेपणास्त्रे भारताच्या संरक्षण यंत्रणेने हवेत यशस्वीरित्या पाडली. दुसरीकडे भारतीय नौदलाने सागरी आघाडीवर पाकिस्तानला जोरदार उत्तर दिले आहे. भारताने पाकिस्तानच्या कराची बंदराला लक्ष्य करून सर्जिकल स्ट्राईकपेक्षाही मोठी कारवाई केली आहे. त्यामुळे कराची बंदराचे मोठे नुकसान झाले आहे.**

- पाकचा हल्ला : भारताचे सडेतोड प्रत्युत्तर
- पाकच्या हल्ल्यात भारताचं कोणतंही नुकसान नाही
- भारताच्या हल्ल्यानंतर पाकचे परराष्ट्र मंत्री ख्वाजा असिफ घाबरला
- सिमेवर पाकिस्तानकडून पुन्हा गोळीबार
- भारताकडून पाकला चोख प्रत्युत्तर




भारतीय नौदलाने रात्रीच्या अंधारात कराची बंदरावर गुप्तपणे हल्ला केला. बंदरावर तैनात असलेल्या पाकिस्तानी नौदलाला सावरण्याची संधीही मिळाली नाही. भारताने एकामागून एक अनेक क्षेपणास्त्रे, टॉर्पेडो आणि ड्रोन हल्ल्यांद्वारे कराची बंदराचे मोठे नुकसान केले. भारतीय नौदलाच्या हल्ल्याचा केंद्रबिंदू केवळ आर्थिक पायाभूत सुविधांवर नव्हता, तर पाकिस्तानी नौदलाची जहाजे, शस्त्रास्त्रे डेपो आणि टेहाळणी करणारी केंद्रे देखील पूर्णपणे उद्ध्वस्त केली आहे. कराची बंदर हे पाकिस्तान नौदलाचा कणा मानले जाते आणि त्यावरील हा हल्ला त्यांच्या सामरिक सामर्थ्याला थेट आव्हान देतो.

पाकिस्तानच्या चिथावणीखोर कृतीला प्रत्युत्तर म्हणून भारतानेही पाकिस्तानवरील अनेक शहरांमध्ये हल्ले केले. भारताने लाहोर, इस्लामाबाद, कराची, सियालकोट, बहावलपूर, पेशावर आणि कोटली येथे जलद प्रत्युत्तर कारवाई करून पाकिस्तानला योग्य उत्तर दिले आहे. पाकिस्तानकडून पठाणकोट एअरबेसला लक्ष्य करत क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. परंतु भारतीय हवाई संरक्षण प्रणालीने हे हल्ले परतवून लावले. दरम्यान, पाकिस्तान सरकार आणि लष्कराकडून हल्ल्याबाबत कोणतेही स्पष्ट विधान करण्यात आलेले नाही. दुसरीकडे कराचीमधील स्फोटांचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. पण पाकिस्तान अधिकृत पुष्टी देण्यास टाळाटाळ करत असल्याचे दिसून येत आहे.

### पाकिस्तानचं खूप मोठं नुकसान; भारतीय सैन्याने पाकची केली पळता भुई थोडी!

पाकिस्तानने जम्मू काश्मीरमध्ये एलओसीवर रात्रभर जोरदार गोळीबार केला. त्याला भारतानेही (India Attacks on Pakistan) चोख प्रत्युत्तर दिलं. भारताने केलेल्या भडीमारात पाकिस्तानी चौक्या अक्षरशः भाजून निघाल्या. दक्षिण काश्मीरमधील पूंछ, राजौरी, सांबा सेक्टरमध्ये एलओसीवर पाकिस्तानचा रात्रभर तोफांचा भडीमार सुरू होता. तो अजूनही सुरूच आहे. पाकिस्तानच्या गोळीबाराला भारतानेही तोडीस तोड उत्तर दिलं. पाकिस्तानातल्या 16 शहरांवर भारतानं जोरदार प्रतिहल्ला करत हाहाकार माजवला. अनेक शहरांमध्ये ब्लॅक आऊट ठेवण्याची वेळ पाकड्यांवर आली. पाकिस्तानातल्या महत्त्वाच्या कराची (Karachi Port) बंदरावर देखील भारतीय नौदलानं हल्ल्यामागून हल्ले केले. 14 पेक्षा जास्त स्फोटांनी कराची बंदर हादरून गेलं. तसेच कराची बंदराचे मोठे नुकसान झाल्याचे सांगितलं जात आहे. भारतीय नौदलाच्या धडक कारवाईनंतर घाबरगुंडी उडालेल्या पाकिस्ताननं कराची बंदरात ब्लॅकआऊट केलं. 1971 नंतर पहिल्यांदाच भारतीय नौसेनेनं पाकिस्तानच्या कराची बंदराला टार्गेट केलं.

भारतानं पाकिस्तानचं सर्वाधिक ताकदीचं लढाऊ विमान पाडलं- भारताला ताकद दाखवण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाकिस्तानच्या हवाई दलाची भारतानं झोप उडवलीय. भारतानं पाकिस्तानची तीन लढाऊ विमानं गारद केली. चीननं दिलेले पाकिस्तानचे दोन जेएफ 17 आणि अमेरिकेच्या एका एफ 16 विमानाचा भारतीय हवाई दलानं लक्ष्यभेद केला. भारतानं तीन विमानं पाडल्याची कबुली पाकिस्ताननंच्या सैन्य अधिकाऱ्यांनी दिलीय. पाकिस्तानसाठी हा मोठा धक्का असल्याचंही त्यांनी मान्य केलंय. एफ 16 विमानं अमेरिकेनं पाकिस्तानला दिलेत.

### पाकिस्तान कुठे कुठे तोंडावर आपटला?

- भारतावर ड्रोन हल्ले केले, पण सगळे अपयशी ठरले
- लढाऊ विमाने पाठवली, एकही यशस्वी झालं नाही
- चार लढाऊ विमाने भारताने लगोलग पाडली
- कराची पोर्ट उद्ध्वस्त
- राजधानी इस्लामाबादेत हल्ले
- पंतप्रधानाच्या घराबाहेर हल्ले, बंकरमध्ये लपण्याची वेळ
- लाहोरमधील हल्ल्यांनी लाज काढली
- पाक सैन्यप्रमुखावरच देशद्रोहाचा खटला
- बलुचिस्तानने पाकिस्तानच्या 3 भागांवर कब्जा केला
- बलुचिस्तानातील चौक्या सोडून पळून जाण्याची वेळ

# कर्जासाठी एकरकमी परतफेड योजना!

## उद्योगासाठी व्यवहार्यता तपासणीची जयकुमार रावल सूचना

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील चंदगड आणि कुडाळ येथे काजू प्रक्रिया उद्योग उभारण्याच्या संदर्भात व्यवहार्यता तपासण्यात यावी. तसेच, पाचशे टन क्षमतेचे गोदाम उभारण्यासंदर्भात नियोजन करावे,' अशी सूचना राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी येथे दिली. महाराष्ट्र राज्य काजू मंडळाची आढावा बैठक मंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्या वेळी त्यांनी ही सूचना केली.**



महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशनचे कार्यकारी संचालक श्रीधर डुबे पाटील, महाराष्ट्र राज्य पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, पणन विभागाचे सहसचिव विजय लहाने तसेच काजू मंडळाचे सदस्य या बैठकीला उपस्थित होते.रावल म्हणाले, 'काजू उत्पादनाच्या वाढीसाठी जगातील चांगल्या काजू वाणाचा अभ्यास करून राज्यात त्याची लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे.

काजू पीक आल्यानंतर त्यावर प्रक्रिया आणि साठवणूक करण्याच्या दृष्टीने महिला बचत गटाची तसेच महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. काजूमधील ओलावा कमी करण्याच्या प्रक्रियेमधे गोदामे उपलब्ध करून देण्यात यावी. काजू उद्योगांना अद्ययावत करण्यासाठी व्हिएतनाम, कंबोडिया यांसारख्या देशातील प्रगत तंत्रज्ञानाचा अभ्यास करावा आणि शंभर टन प्रती दिन उत्पादन क्षमतेचे प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी उपाययोजना कराव्यात.

' 'पणन मंडळाच्या थकीत कर्जाबाबत एकरकमी परतफेड योजना विचाराधीन असून, त्या संदर्भात नवीन धोरण ठरविण्यात येईल,' अशी माहिती राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी येथे दिली.बाजार समित्यांचे आर्थिक स्वास्थ्य चांगले राहील, याची काळजी घेऊन बाजार समित्यांमध्ये विविध विकासकामे करताना स्टार्ट-अपना प्राधान्य द्यावे आणि त्या संदर्भातील प्रस्ताव संचालक मंडळांच्या बैठकीत सादर करावेत, अशी सूचना त्यांनी केली. महाराष्ट्र राज्य कृषी पणन संचालक मंडळाची आढावा बैठक रावल यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्या वेळी ते बोलत होते. कृषी आयुक्त सूरज मांढरे, सहकार आयुक्त दीपक तावरे, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, संचालक विकास रसाळ, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, व्यवस्थापक शैलेश जाधव, तसेच पणन मंडळाचे सदस्य नारायण पाटील, संचालक संजय पाटील यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. रस्ते दुरुस्ती, अंशदान आणि कर्जवसुलीचा आढावा घेऊन विविध विकासकामांसाठी कर्ज मागणी प्रस्तावांवरही या बैठकीत चर्चा करण्यात आली.

### कर्ज रक्कम मंजूर करण्यात येऊ नये

'बाजार समित्यांनी संचालक मंडळाच्या बैठकीत परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत. प्रस्तावातील मागणीच्या खर्चाचे प्रमाण (रेशो) निश्चित करून २५ टक्के स्वनिधी खर्च झाल्याशिवाय उर्वरित कर्ज रक्कम मंजूर करण्यात येऊ नये. उर्वरित ७५ टक्के निधीतील किमान ५० टक्के रक्कम शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणाऱ्या सुविधा निर्माण करण्यासाठी वापरण्यात याव्यात. रस्तेदुरुस्तीसाठी बाजार समित्यांनी स्वनिधी वापरावा. थकीत कर्जवसुली प्रकरणी विभागीय कार्यालयांनी बाजार समित्यांना भेटी देऊन ज्या बाजार समित्यांवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे, तेथील वसुली शंभर टक्के करावी,' असे रावल यांनी सांगितले.

# जलसंपदा विभागाची महामंडळांना स्वायत्ता

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील जलसंपदा विभागाच्या महामंडळांना स्वायत्त करण्यात येणार असून, निधी उभारणीसाठी महामंडळांना अधिकार देण्यात येणार आहेत. त्यासाठी विशेष समितीची स्थापना करण्यात आली आहे. जलसंपदा विभागाच्या नियामक मंडळाच्या बैठकीत हा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सिंचन भवन येथे नियामक मंडळाची बैठक गुरुवारी झाली.**



त्यामध्ये झालेल्या निर्णयांची माहिती विखे-पाटील यांनी पत्रकारांना दिली. जलसंपदा विभागाचे अप्पर मुख्य सचिव दीपक कपूर, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता हणमंत कुणाले, प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता हणुमंत धुमाळ यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.'जलसंपदा विभागाची कार्यरत असलेली महामंडळे निधीसाठी राज्य सरकारवर अवलंबून आहेत. महामंडळांचा विकास करण्यासाठी निधीची कमतरता जाणवत आहे. ही महामंडळे स्वायत्त केल्यास त्यांच्याकडील उपलब्ध साधनांचा वापर करून निधी वाढविण्यासाठी प्रयत्न करणे शक्य होणार आहे. सरकारी अनुदानावरही अवलंबून राहणे योग्य ठरणार नाही. महामंडळाच्या क्षेत्रात पर्यटन विकास वाढीवरही भर देण्यात येणार असून, त्यासाठी निधी उभारण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील,' असे विखे-पाटील यांनी सांगितले. ते म्हणाले, 'महामंडळे स्वायत्त झाल्यानंतर अधिकारी आणि कर्मचारी यांचे वेतन स्वत: महामंडळांकडून दिले जाईल. महामंडळासाठी वित्तीय सल्लागार समितीही स्थापन करण्यात येणार आहे. तर, बारामती पंचायत समितीला महामंडळाची जागा देण्यासंदर्भातही निर्णय या बैठकीत घेण्यात आला असून, यापुढे अशा संस्थांना जागा देताना रेडिरेकनरच्या दरानुसार रक्कम आकारण्यात येणार आहे. धरणांच्या हद्दीतील अतिक्रमणांची संख्या वाढली आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठाही दूषित होत आहे. त्यामुळे यापुढे ही अतिक्रमणे काढण्यात येणार असून, तशी सूचना राधाकृष्ण विखे-पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना या बैठकीत दिली.'महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत, औद्योगिक वसाहती यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर थकीत पाणीपट्टी आहे. ही रक्कम २ हजार २०० कोटींच्या आसपास असून, ती वसूल करण्यात येण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येईल,' असेही राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले. स्थानिक स्वराज्य संस्थांना ८० टक्के पाण्यावर पुर्नप्रक्रिया करणे आवश्यक आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आले तर आनंद आहे. त्यासंदर्भात कोणताही आक्षेप नाही, असे विखे पाटील यांनी सांगितले.

### पवार एकत्र येण्याबाबतही भाष्य

जलसंपदा विभागाचे अप्पर मुख्य सचिव दीपक कपूर, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता हणमंत कुणाले, प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता हणुमंत धुमाळ यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.'जलसंपदा विभागाची कार्यरत असलेली महामंडळे निधीसाठी राज्य सरकारवर अवलंबून आहेत.

## पिंपरी महापालिका इमारतीमध्ये मॉकड्रिल यशस्वी

# चिखली-चऱ्होलीत संघर्षाचा निर्धार!

## माजी महापौरांसह ग्रामस्थांचा एल्गार : प्रशासनाची मनमानी चालू देणार नाही

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासन शहराचा डीपी आराखडा अंतिम टप्प्यात असतानाही चिखली आणि चऱ्होली गावांमध्ये टिपी स्कीम राबवण्याचा प्रयत्न करीत आहे. या प्रक्रियेमध्ये स्थानिक भूमिपुत्र आणि लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतलेले नाही. त्यामुळे टिपी स्कीम तातडीने रद्द करावी, अन्यथा महानगरपालिका प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा निर्धार ग्रामस्थ व सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी केला आहे.**



टाळगाव चिखली येथील श्री गणेश मंदिरामध्ये श्री भैरवनाथ टीपी स्किम विरोधी कृती समितीच्या वतीने आज ग्रामस्थांची बैठक घेण्यात आली. यावेळी माजी महापौर राहुल जाधव, माजी महापौर नितीन काळजे यांच्यासह चिखली गाव परिसर, जाधववाडी, कुदळवाडी, नेवाळे वस्ती, हरगुडे वस्ती या भागातील भूमिपुत्र, उद्योजक, युवक उपस्थित होते. महापालिकेचा कारभार लोकशाही पद्धतीने झाला पाहिजे, असे अपेक्षीत असताना प्रशासन मनमानीपणे काम करीत आहे. शहराच्या विकासासाठी भूमिपुत्रांनी जमीनी दिल्या आहेत. “जमीन आमची माय आहे. तिच्यावर डोळा ठेवणाऱ्या प्रशासनला अद्दल घडवू” असा निर्धार यावेळी ग्रामस्थांनी केला आहे.

> महापालिका प्रशासनाने टिपी स्कीम बाबत थेट नोटीफिकेशन काढले. आम्हा गावकरी, भूमिपुत्र किंवा माजी पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेतले नाही. आमदार महेश लांडगे यांनीही या टिपी स्कीम ला विरोध केला आहे. प्रशासनाची मनमानी आम्ही चालू देणार नाही. याबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे लेखी दाद मागणार असून, चिखली आणि चऱ्होली ग्रामस्थांवर टिपी स्कीम लादण्याचा प्रयत्न हाणून पाडणार आहोत.
>
> **–राहुल जाधव,** माजी महापौर

> आयुक्त शेखर सिंह मनमानीपणे निर्णय घेत आहेत. यापूर्वी कुदळवाडीमध्ये केवळ अनधिकृत भंगार दुकानांवर कारवाई करणार असे अनेकदा आयुक्तांनी म्हटले होते. मात्र, प्रत्यक्षात सरसकट कारवाई करण्यात आली. त्यामुळे भूमिपुत्र आणि लघु उद्योजकांचे नुकसान झाले. महापालिकेत प्रशासक राजवट आहे. त्याच्या नावाखाली प्रशासन मनमानीपणे टिपी स्कीम लादण्याचा प्रयत्न करीत आहे. याबाबत आमदार किंवा आम्हाला विश्वासात घेणे अपेक्षीत होते. भूमिपुत्रांवर अन्याय कदापि सहन करणार नाही.
>
> **– नितीन काळजे,** माजी महापौर

## भूमिपुत्रांच्या न्याय हक्कांबाबत “नो कॉम्प्रमाईज” !

## आमदार महेश लांडगे यांचे चिखली ग्रामस्थांना आश्वासन

### कोणत्याही परिस्थितीत टीपी स्कीम होवू देणार नाही!

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**“भूमिपुत्रांचा स्वाभिमान आणि न्याय हक्कांसाठी संघर्ष” हेच माझ्या राजकीय व सामाजिक जीवनाचा केंद्रबिंदू राहिला आहे. मौजे चिखली आणि चऱ्होलीत महानगरपालिका प्रशासन टीपी स्कीम लादण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र, भूमिपुत्रांच्या न्याय हक्कांबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. कोणत्याही परिस्थितीमध्ये टीपी स्कीम होवू देणार नाही, असा विश्वास आमदार महेश लांडगे यांनी ग्रामस्थ, भूमिपुत्रांना दिला आहे.**

टाळगाव चिखली येथे श्री गणेश मंदिरामध्ये आज श्री भैरवनाथ टीपी स्कीम विरोधी कृती समितीच्या पुढाकाराने सर्व ग्रामस्थ, आजी-माजी पदाधिकारी, भूमिपुत्रांची बैठक घेण्यात आली. त्यानंतर ग्रामस्थांच्या वतीने स्थानिक आमदार महेश लांडगे यांना मागणीचे निवेदन देण्यात आले. पिंपरी-चिंचवड शहराच्या स्थापनेपासून 3 ते 4 वेळा आमच्या हक्काच्या जमिनींचे शासनाच्या वतीने भूसंपादन करण्यात आले आहे. 1970 च्या दरम्यान औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगधंद्यांसाठी भूसंपादन केले, हा पहिला अन्याय झाला. त्यानंतर पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची स्थापना करुन आमचा विरोध असतानाही जमिनी ताब्यात घेतल्या. टाटा मोटर्स कंपनीच्या विस्तारासाठी पुन्हा आमच्या जमिनींवर भूसंपादनाची कारवाई केली. त्यावेळीही आम्ही आंदोलन उभा केले होते. 1997 मध्ये ग्रामस्थांचा विरोध असताना गावांचा समावेश महानगरपालिका हद्दीत करण्यात आला. प्रत्येकवेळी भूमिपुत्रांवर अन्याय झाला आहे, अशा भावना ग्रामस्थांनी बोलून दाखविल्या.




### टीपी स्कीम तात्काळ रद्द करा...

“आमच्या बागायती जमिनी महानगरपालिका, नवनगर विकास प्राधिकरण, औद्योगिक विकास महामंडळाने ताब्यात घेवून आम्हाला भूमिहीन करण्याचा घाट घातला आहे. अन्य ठिकाणी राबवण्यात आलेल्या टीपी स्कीम ची अवस्था पाहिली असता, आगामी 25 वर्षांत चिखली-चऱ्होलीत ही योजना पूर्ण होणार नाही. या योजनेमुळे एक गुंठा जमीन घेतलेल्या व्यक्तीपासून बागायती शेती असलेल्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसानच होणार आहे. त्यामुळे आमचा टीपी स्कीम ला तीव्र विरोध आहे, ही योजना तात्काळ रद्द करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी यावेळी केली.

> चिखली आणि चऱ्होलीसह समाविष्ट गावांमध्ये 2014 पासून विकासकामे आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्यासाठी आम्ही पाठपुरावा करीत आहोत. “समाविष्ट गावांचा विकास” या मुद्द्यावर या भागातील भारतीय जनता पार्टी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भूमिपुत्रांनी कायम साथ दिली आहे. राज्यात भाजपा महायुतीचे सरकार आहे. प्रशासकीय राजवटीचा आधार घेऊ प्रशासन टीपी स्कीम लादण्याचा प्रयत्न करीत असेल, तर ते कदापि होवू देणार नाही. संपूर्ण शहरासाठीचा महानगरपालिकेचा विकास आराखडा अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे स्वतंत्र टीपी स्किमची आवश्यकता नाही, अशी आमची ठाम भूमिका आहे.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने »



### भगवंताचे अनुसंधान राखावे

फार दिवस वापरून जोडा फाटला की तो दुरुस्त केला तरी पुन: पुन: फाटतोच. तसेच शरीराचे आहे. शरीर जीर्ण झाल्यावर त्याला काही ना काही तरी होतच राहते. दुरुस्त केलेल्या जोड्यातला एखादा खिळा जर पायाला टोचू लागला तर मात्र त्याला जपावे लागते. तसे, आजारपणामुळे मनाला टोचणी लागली तर जपावे आणि त्याचा मनावर परिणाम होऊ देऊ नये. आपल्या आजाराचा, म्हातारपणाचा आपण फायदा करून घ्यावा. एखादी शहाणी सुगरण बाई ज्याप्रमाणे कोंड्याचा मांडा करते, त्याप्रमाणे आपण आपल्या दुखण्यामधून भगवंताचे अनुसंधान टिकवायला शिकले पाहिजे. अनुसंधानात असले की प्रपंचात मजा आहे; अडचणी आणि संकटे यांचीसुद्धा मजा वाटेल. पोहायला येणाऱ्या एखाद्याला नुसते सरळ पोहायला सांगितले तर आवडणार नाही. तो उड्या मारील, बुड्या मारील, वाकडातिकडा पोहेल; तसे, भगवंताच्या अनुसंधानात राहिले तर प्रपंचाची मजा वाटेल. कोणतीही गोष्ट एकदा ओळखली की मग तिची नाही भीती वाटत. विषय जोवर ओळखले नाहीत तोवरच ते आपल्याला त्रास देतात. याकरिता, ज्या ज्या गोष्टी होत असतात, त्या त्या भगवंताच्या इच्छेनेच होत आहेत, ही जाणीव ठेवून वृत्ती आवरण्याचा प्रयत्न करावा. परमार्थाच्या आड आपले आपणच येत असतो. आपली वृत्ती जिथे जिथे वावरते तिथे तिथे भगवंताची वस्ती असते. म्हणून वृत्ती जरी कोणतीही उठली तरी तिथे भगवंताची आठवण केली तर ती चटकन् मावळते. आपण नेहमी आपल्या उपास्य देवतेचे स्मरण करीत असावे. त्याच्या पायावर मस्तक ठेवावे, आणि त्याची अनन्य भावाने प्रार्थना करावी की, " हे भगवंता, तुझ्या आड येणारे हे विषय तुझ्या कृपेशिवाय नाही दूर होणार. आजवर जगाचा मी अनुभव पाहून घेतला. तुझ्या प्राप्तीशिवाय कशातही सुख नाही असे भासू लागले, तरी वृत्ती आड आल्याशिवाय रहात नाही. माझ्या अज्ञानाने मी आज स्वत:च्याच आड येत आहे. तरी तुझी, म्हणजे पर्यायाने माझीच, ओळख मला पटावी, आणि त्यात मी तुला पाहावे, हीच माझ्या जीवितातली शेवटची इच्छा आहे. ही इच्छा तुझ्या कृपेशिवाय पूर्ण होणे शक्य नाही. तरी, हे भगवंता, माझे मन तुझ्या चरणी राहो असे कर. यापेक्षा मला जगात दुसरे काहीही नको. आता मी तुझा झालो. यापुढे जे काही होईल ती तुझीच इच्छा मानून मी राहीन, आणि तुझे नाम घेण्याचा आटोकाट प्रयत्न करीन. तू मला आपला म्हण."

बोधवचन:- वृत्ती स्थिर झाली की त्याच्या मागोमाग समाधान येतेच.

# 'जमात-ए-पुरोगामी' ची हार, तोंड दाबून, बुक्क्यांचा मार !



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक



**पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी काश्मीर खोऱ्यातील पहलगाम मध्ये टिपून टिपून हिंदूंवर केलेला भ्याड हल्ला.. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या टीमनं अत्यंत नियोजनबद्ध रीतीनं पाकिस्तानवर केलेला प्रहार.. त्याचे भारतात आणि जगभर होत असलेलं कौतुक..विशेषतः भारतीय जवानांनी केलेली अतुलनीय कामगिरी, हे सगळं कसं अगदी दृष्ट लागण्यासारखं घडलं ! पण, आपल्या देशात एक कायम गरळ ओळखणारी टोळी आहे..जमात-ए-पुरोगामी !.. त्यांना हे सगळं कसं सहन होईल बरं ? नको तिथं आग लागली आहे आणि संपूर्ण देशभर 'बर्न ऑल' शोधत फिरत आहेत, बिचारे !**

### पुरोगामी जोकरांकडून करमणूक..

'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी झाल्याच्या बातम्या बुधवारी सकाळपासूनच सर्व सोशल मीडियावरून दूरवर ऐकवल्या गेल्या आणि रॉकेटच्या बुडाला लागते तशी आग देशातील पुरोगाम्यांच्या बुडाला लागली ! मोदींचे तर कौतुक करायचे नाही, मग, सैन्य कसे भारी, पूर्वीचे मनमोहन सिंग सरकार कसे भारी, अशा तारेवरच्या कसरती करत डोंबाऱ्याचा खेळ खेळणाऱ्या या जमातीची कमालीची कोंडी झाली आणि त्यांनी करमणुकीचा एक फडच उभा केला !

### चला, लष्कराचे कौतुक ऐकू या..

'ऑपरेशन सिंदूर' कमालीचे यशस्वी झाल्यामुळे उघड विरोध तर करता येत नव्हता, कारण ते त्यांच्या 'एथिक्स' मध्ये बसत नाही. शिवाय, अशा वेळी लोकच शेण घालतील तोंडात ! पण मोदी सरकारला श्रेय तर चुकूनही द्यायचे नाही. या पार्श्वभूमीवर 'जमात-ए-पुरोगामी' ने सर्व श्रेय लष्कराला देणाऱ्या पोस्ट टाकून अक्षरशः पाऊस पाडला, जणू काही सैन्यच स्वतःहून नियंत्रण रेषा पार करायचा, एअर स्ट्राईक करायचा निर्णय घेतं, प्रेस कॉन्फरन्स घ्यायचं ठरवतं.. पण जाऊ दे, हेही नसे थोडके!

### जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणारी जमात..

पण हे शक्य असतं तर २६/११ मध्ये मुंबईत जे इतके भयानक पाकिस्तान प्रणित दहशतवादी हल्ले झाले, त्याचे प्रत्युत्तर म्हणून भारतीय लष्कराने एअरस्ट्राईक्स नसते का केले ? आपले जवान, आपले लष्कर आणि आपली सैन्यशक्ती तेव्हाही इतकीच सक्षम होती की ! याकडे, या जमातीने जाणीवपूर्वक कानाडोळा केला, हे लक्षात आलं असेलच..

### परिस्थिती तेव्हाची आणि आत्ताची !

थोडे आठवा, २६/११ चा मुंबईतील दहशतवादी हल्ला आणि पहलगामचा दहशतवादी हल्ला.. तेव्हाचे भीषण राजकीय मौन आणि नेभळटपणा विरुद्ध आता दोन आठवड्यांच्या आत दिलेले 'ऑपरेशन सिंदूर' चे दणदणीत प्रत्युत्तर यात फरक काय ? एकीकडे भारताचे गलीतगात्र नेतृत्व आणि दुसरीकडे आव्हानांचा गोवर्धन गिरी करंगळीवर तारणारे नेतृत्व.. फरक स्पष्ट आहे, पण तो मान्य करण्याची मानसिकता या जमातीकडे नाही, तो विचार करण्याची कुवतही त्यांच्याकडे नाही ! फरक आहे राजकीय इच्छाशक्तीचा, सैन्यामागे सर्व शक्तिनिशी ठामपणे उभ्या राहणाऱ्या सशक्त नेतृत्वाचा. 'घरमें घुस के मारेंगे' म्हणणाऱ्या विजिगिषु वृत्तीचा !

### थोडासा बुद्धीला ताण देऊ या !

२६/११ च्या वेळी भारताचे वायुदल प्रमुख असलेल्या एअर चीफ मार्शल फली मेजर यांनी बालाकोट एअरस्ट्राईकनंतर दिलेल्या एका मुलाखतीत हे अगदी थेट आणि स्पष्टपणे सांगितलं होतं की 'भारताची राजकीय इच्छाशक्ती बदलली आहे.' त्यांच्यानंतरचे वायुदल प्रमुख बी. एस. धनोआ यांनी तर 'व्हीजेटीआय' च्या शेकडो विद्यार्थ्यांसमोर स्पष्टपणे सांगितलं होतं, की २६/११ नंतर वायुदलाने पाकिस्तानात घुसून तिथले दहशतवादी तळ नष्ट करण्याचा पूर्ण प्लॅन तत्कालीन मनमोहन सिंग सरकारला दिला होता, पण आपली आंतरराष्ट्रीय प्रतिमा जपण्यासाठी त्यांनी या प्लॅनला स्पष्ट शब्दात नकार दिला होता म्हणून !

### कोणीही यावे, टपली मारून जावे..

स्वतः कमालीचे कमकुवत, निर्णय घेण्यास अक्षम असे तत्कालिन पंतप्रधान मनमोहन सिंग आणि आपली छबी जपण्याच्या हव्यासात हरवलेल्या सोनिया गांधी यांनी लष्कराला पूर्ण मोकळीक दिली नाही आणि राष्ट्रीय सुरक्षेचं राजकारण केलं. परिणाम काय झाला? आजही आपण २६/११ ला जबाबदार असलेल्या पाकिस्तान मधल्या लोकांना शिक्षा करू शकलेलो नाही. २००८ मध्ये भारताची परिस्थिती आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणीही यावे, टपली मारून जावे, अशीच होती.

### आज परिस्थिती काय आहे?

भारताने पाकिस्तानात थेट १०० किलोमीटर आत घुसून हल्ले केले, न अमेरिकेने एक चकार शब्द उच्चारला, न इस्लामी देशांनी. इराण पासून अफगाणिस्तानसारखे इस्लामी कट्टरतावादी देश देखील पाकिस्तानच्या विरोधात आहेत. मोदींचे परराष्ट्र धोरण जर इतके सशक्त नसते, तर हे शक्यच नसते, पण सुमार डोक्याच्या विचारवंतांना हे कोण सांगणार?

### याला म्हणायचं, घुसून मारले !

पहलगाम हल्ल्यानंतर फक्त एका पंधरवड्यात भारतीय सैन्याने पाकिस्तानात नऊ वेगवेगळ्या ठिकाणी घुसून अचूक आणि थेट कारवाई केली, तीही केवळ नियंत्रण रेषेपलीकडेच नाही, तर पाकिस्तानी पंजाबमध्ये तब्बल १०० किलोमीटर आत असलेल्या बहावलपूरपर्यंत. हे सारे स्ट्राईक्स प्रिसिजन स्ट्राईक होते, म्हणजे दहशतवादी ट्रेनींग सेंटर नेमके कुठे आहेत याची पक्की माहिती काढून अतिशय नेटकेपणाने हे स्ट्राईक्स प्लॅन केले गेले होते. हे काही एका दिवसात घडत नाही, किंवा फक्त लष्कर हा निर्णय घेत नाही, घेऊ शकत नाही !

### पाठीशी खंबीर नेतृत्व असणे महत्त्वाचे !

हे एअरस्ट्राईक्स आपले सैन्य किंवा वायुदल अचानक अधिक सक्षम झाल्यामुळे घडले नाहीत. आपले जवान नेहमीच सक्षम होते. फरक इतकाच आहे की आता त्यांच्या पाठीशी खंबीर राजकीय नेतृत्व उभं आहे. ऑपरेशन सिंदूरचे श्रेय फक्त लष्कराचं श्रेय आहे, मोदींचं नाही म्हणणाऱ्या बिनडोक मोदीद्वेष्ट्यांनी जराशी स्वतंत्र विचार करण्याची क्षमता विकत घ्यावी.. त्यांचा पुरोगामीत्वाचा बुरखा टराटरा फाटला आहे, हे नक्की!

### महिलांचा केवढा मोठा सन्मान !

फक्त हिंदू पुरुषांना टार्गेट करून २६ हिंदू स्त्रियांना विधवा करणाऱ्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर केलेल्या लष्करी कारवाईला मुद्दाम समजून उमजून 'ऑपरेशन सिंदूर' हे नाव देणे, कारवाईची अचूक वेळ, दोन स्त्री ऑफिसर, एक हिंदू आणि एक मुस्लीम यांची पत्रकार परिषदेसाठी निवड करणे, त्यातही नॉन-कॉम्बॅट सिग्नल कोअर शाखेतील कर्नल सोफिया कुरैशी यांची पत्रकार परिषदेसाठी निवड करणे, हे सगळं योगायोगाने झालं असं वाटतंय का? त्याच वेळी, पंतप्रधानांनी स्वतः महिला राष्ट्रपतींना ब्रिफ करायला जाणं, ही काय आपोआप घडून आलेली गोष्ट आहे का?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पाकिस्तान नकाशावर राहणार नाही!

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची जहाल टीका

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**ऑपरेशन सिंदूर यशस्वी करत भारतीय लष्कराने पाकपुरस्कृत दहशतवादाचे कंबरडे मोडले. यानंतर खवळलेल्या पाकिस्तानने गुरूवारी रात्री जम्मू-काश्मीर, पंजाब आणि राजस्थानच्या सीमावर्ती भागात ड्रोन हल्ले करण्याचा प्रयत्न केला. मात्र भारतीय लष्कराने त्यालाही चोख प्रत्युत्तर देत पाकिस्तानी ड्रोन, क्षेपणास्त्र हाणून पाडले. या घडामोडीवर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. नागपूर येथे माध्यमांशी बोलत असताना शिंदे यांनी पाकिस्तानची लायकी काढली. तसेच भारतावर हल्ला करण्याची त्यांची औकात नाही, असे म्हटले.**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, पाकिस्तानची भारतावर हल्ला करण्याची औकात नाही. ते प्रयत्न करत असले तरी ते अन्नाचे मोहताज आहेत. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून त्यांना धडा शिकवलाच आहे. पण तरीही ते भारताविरोधात काही करत असतील तर भारतीय लष्कर पाकिस्तानचे नाव मिटवून टाकतील. नकाशावरही पाकिस्तान दिसणार नाही. त्यांनी त्यांच्या लायकीत राहिले पाहिजे. पाकिस्तानच्या तीन फायटर जेटना पाडण्यात आल्याची माहिती पत्रकाराने शिंदे यांना दिल्यानंतर ते म्हणाले की, हा तर फक्त ट्रेलर आहे. पाकिस्तानने जास्त हुशारी केल्यास त्यांना जशास तसे उत्तर मिळेल. आमच्या सैनिकांनी एकाही सामान्य नागरिकावर हल्ला केला नव्हता. आपल्या सैन्याने फक्त दहशतवादी तळ उध्वस्त केले. पण तरीही पाकिस्तान भारताविरोधात काही कारवाई करत असेल तर त्यांना हे महागात पडेल. पाकिस्तानला याची किंमत मोजावी लागेल, असेही एकनाथ शिंदे म्हणाले. बुधवारी (७ मे) भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर राबविल्यानंतर पाकिस्तानकडून जम्मूच्या सीमेवरील गावांमध्ये बेछूट



गोळीबार आणि तोफगोळ्यांचा मारा करण्यात आला. या हल्ल्यात १६ नागरिकांना प्राण गमवावे लागले. यानंतर गुरुवारी सायंकाळी पुन्हा एकदा पाकिस्तानकडून जम्मू, पंजाबच्या सीमाभागात ड्रोन हल्ले करण्यात आले.तत्पूर्वी गुरुवारी (८ मे) सकाळी पाकिस्तानने श्रीनगर पासून ते गुजरातच्या भूजपर्यंत पसरलेल्या सीमेवरील भारतीय लष्कराच्या तळावर ड्रोन हल्ले करण्याचा प्रयत्न केला. भारताने या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देत सर्व ड्रोन निकामी केले. याशिवाय थेट लाहोर येथे असलेली डिफेन्स रडार सिस्टिम उध्वस्त केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, पाकिस्तानची भारतावर हल्ला करण्याची औकात नाही. ते प्रयत्न करत असले तरी ते अन्नाचे मोहताज आहेत. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून त्यांना धडा शिकवलाच आहे. पण तरीही ते भारताविरोधात काही करत असतील तर भारतीय लष्कर पाकिस्तानचे नाव मिटवून टाकतील. नकाशावरही पाकिस्तान दिसणार नाही. त्यांनी त्यांच्या लायकीत राहिले पाहिजे. पाकिस्तानच्या तीन फायटर जेटना पाडण्यात आल्याची माहिती पत्रकाराने शिंदे यांना दिल्यानंतर ते म्हणाले की, हा तर फक्त ट्रेलर आहे. पाकिस्तानने जास्त हुशारी केल्यास त्यांना जशास तसे उत्तर मिळेल. आमच्या सैनिकांनी एकाही सामान्य नागरिकावर हल्ला केला नव्हता. आपल्या सैन्याने फक्त दहशतवादी तळ उध्वस्त केले. पण तरीही पाकिस्तान भारताविरोधात काही कारवाई करत असेल तर त्यांना हे महागात पडेल. पाकिस्तानला याची किंमत मोजावी लागेल, असेही एकनाथ शिंदे म्हणाले. बुधवारी (७ मे) भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर राबविल्यानंतर पाकिस्तानकडून जम्मूच्या सीमेवरील गावांमध्ये बेछूट गोळीबार आणि तोफगोळ्यांचा मारा करण्यात आला. या हल्ल्यात १६ नागरिकांना प्राण गमवावे लागले. यानंतर गुरुवारी सायंकाळी पुन्हा एकदा पाकिस्तानकडून जम्मू, पंजाबच्या सीमाभागात ड्रोन हल्ले करण्यात आले.तत्पूर्वी गुरुवारी (८ मे) सकाळी पाकिस्तानने श्रीनगर पासून ते गुजरातच्या भूजपर्यंत पसरलेल्या सीमेवरील भारतीय लष्कराच्या तळावर ड्रोन हल्ले करण्याचा प्रयत्न केला.

### ऑपरेशन सिंदूर यशस्वी

भारताने या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देत सर्व ड्रोन निकामी केले. याशिवाय थेट लाहोर येथे असलेली डिफेन्स रडार सिस्टिम उध्वस्त केली.ऑपरेशन सिंदूर यशस्वी करत भारतीय लष्कराने पाकपुरस्कृत दहशतवादाचे कंबरडे मोडले. यानंतर खवळलेल्या पाकिस्तानने गुरूवारी रात्री जम्मू-काश्मीर, पंजाब आणि राजस्थानच्या सीमावर्ती भागात ड्रोन हल्ले करण्याचा प्रयत्न केला. मात्र भारतीय लष्कराने त्यालाही चोख प्रत्युत्तर देत पाकिस्तानी ड्रोन, क्षेपणास्त्र हाणून पाडले. या घडामोडीवर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. नागपूर येथे माध्यमांशी बोलत असताना शिंदे यांनी पाकिस्तानची लायकी काढली.

# ‘पंढरपूर कॉरिडॉर’साठी बाधितांचे सर्वेक्षण!

## बारा पथकांद्वारे काम; काही बाधितांचा विरोध

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील चौफाळा ते महाद्वार घाट या दरम्यान कॉरिडॉर प्रस्तावित आहे. यामधील सुमारे ६३० मालमत्ताधारकांचे सामाजिक-आर्थिक निकषाबाबत सर्वेक्षण सुरू झाले आहे. येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालातील विद्यार्थी आणि पालिकेतील अधिकारी यांच्यामार्फत या सर्वेक्षणाला सुरुवात झाली आहे.**





यासाठी १२ पथकांद्वारे या सर्वेक्षणाचे काम पुढील चार दिवसांत होणार असून, मालमत्ताधारकांनी सर्वेक्षणासाठी येणाऱ्या पथकास योग्य माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. काही बाधितांनी याला विरोध केला आहे.येथे श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने येत आहेत. यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. भविष्यातील गरज लक्षात घेता श्री विठ्ठल मंदिर परिसरात कॉरिडॉर करण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे. या संदर्भात १ व २ मे रोजी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी येथील स्थानिक नागरिक, व्यापारी, विक्रेते यांच्याशी प्राथमिक चर्चा करून समस्या जाणून घेतल्या होत्या. तसेच, प्रशासन काय करणार याची सर्व माहिती वरील सर्वांना दिली. त्या अनुषंगाने प्राथमिक सर्वेक्षणास गुरुवारपासून १२ पथकांद्वारे सुरुवात झाली. या पथकात केबीपीचे महाविद्यालयीन विद्यार्थी, पंढरपूर नगरपालिकेचे अधिकारी-कर्मचारी यांचा समावेश आहे. हे सर्वेक्षण प्राथमिक असून, ६३० मालमत्ताधारकांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.या बाधितांना द्यावयाचा मोबदला हा जास्तीचा मिळावा, यासाठी त्या बाधित कुटुंबाची सामाजिक, आर्थिक माहिती घेतली जाणार आहे. यामध्ये जागेची माहिती, जागेचा वापर, व्यावसायिक असेल, तर अंदाजे उत्पन्न आदी माहिती संकलित केली.

### कॉरिडॉर रद्दची मागणी

जाणार आहे. विकास आराखड्याची व्याप्ती लक्षात घेऊन संबंधितांना विश्वासात घेऊन द्यावयाची भरपाई व पुनर्वसन याबाबत प्रस्ताव तयार करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने बाधितांना जास्तीत जास्त मोबदला देता येईल, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. तरी बाधितांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.मंदिर परिसरातील काही बाधितांनी नुकत्याच झालेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत विरोध केला होता. केवळ यात्रेतील गर्दी बघून आमची घरे पाडू नका. वस्तुस्थिती समजून घ्या. या आधी आमची घरे पाडली, त्याचा मोबदला मिळाला नाही. त्यामुळे काही बाधित मालमत्ताधारकांनी कॉरिडॉरला विरोध करण्याची भूमिका घेतली आहे.यासाठी १२ पथकांद्वारे या सर्वेक्षणाचे काम पुढील चार दिवसांत होणार असून, मालमत्ताधारकांनी सर्वेक्षणासाठी येणाऱ्या पथकास योग्य माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# भारत-पाकिस्तान तणाव शिगेला!

## देशातील 'या' 24 विमानतळांवरील उड्डाणे थांबवली

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जम्मूमधील अनेक शहरांना लक्ष्य करून गुरुवारी रात्री पाकिस्तानकडून डागण्यात आलेल्या क्षेपणास्त्रांना भारताने रोखण्यात भारतीय लष्कराला यश मिळाले आहे. या दरम्यान नागरी उड्डाण मंत्रालयाने उत्तर भारतातील किमान २४ विमानतळांवर पुढील सूचना येईपर्यंत नागरी उड्डाण स्थगित करण्यात आल्याचे स्पष्ट केले आहे.**



ऑपरेशन सिंदूर अंतर्गत खबरदारीच्या उपाययोजनांचा एक भाग म्हणून हे पाऊल उचलण्यात आले आहे. ऑपरेशन सिंदूरद्वारे सशस्त्र दलांनी गेल्या महिन्यात २६ जणांचा बळी घेणाऱ्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी बुधवारी पाकिस्तान व पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हल्ले केले होते.पाकिस्तानने जम्मू, तसेच पंजाब आणि राजस्थानच्या काही भागांना लक्ष्य करून ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांची मालिका सुरू केल्यानंतर ही सूचना जारी करण्यात आली. बुधवारी उशिरा संध्याकाळपासून जम्मूमध्ये संपूर्ण काळोख होता, नागरिकांनी आकाशात क्षेपणास्त्रांच्या रेषा पाहिल्याचे वृत्त आहे."जम्मूमध्ये पूर्ण काळोख असून, मोठ्याने स्फोट, बॉम्बस्फोट, गोळीबार किंवा क्षेपणास्त्र हल्ल्याचा संशय आहे. घाबरू नका, माता वैष्णवी देवी आणि भारतीय सशस्त्र दलही आपल्यासोबत आहेत," असे जम्मू आणि काश्मीरचे माजी पोलीस महासंचालक शेष पॉल वैद म्हणाले.नागरी उड्डाण मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, चंदीगड, जम्मू आणि काश्मीर, अमृतसर, लुधियाना, भुंटर, किशनगड, पटियाला, शिमला, कांगडा-गग्गल, भटिंडा, जैसलमेर, जोधपूर, बिकानेर, हलवारा, पठाणकोट, जम्मू, लेह, मुंद्रा, जामनगर, हिरासर (राजकोट), पोरबंदर, केशोड, कांडला आणि भुज ही विमानतळे पुढील सूचना मिळेपर्यंत नागरी प्रवासासाठी बंद राहणार आहेत. नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरोने विमानतळांच्या टर्मिनल इमारतीत भेट देणाऱ्यांच्या प्रवेशावर बंदी घातली आणि वाढीव सुरक्षा व्यवस्थेचा भाग म्हणून सर्व उड्डाणांसाठी सुरक्षा तपासणी आणखी कठोर केली आहे. सुरक्षा व्यवस्था वाढवण्याचा एक भाग म्हणून, नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरोने सर्व विमानतळांवरील सर्व उड्डाणांसाठी सेकंडरी लॅडर पॉइंट चेकिंग अनिवार्य केले आहे. साधारणपणे, याचा अर्थ विमानात चढण्यापूर्वी प्रवाशांची आणि त्यांच्या हातातील सामानाची तपासणी करणे असा होतो.ऑपरेशन सिंदूर अंतर्गत खबरदारीच्या उपाययोजनांचा एक भाग म्हणून हे पाऊल उचलण्यात आले आहे. ऑपरेशन सिंदूरद्वारे सशस्त्र दलांनी गेल्या महिन्यात २६ जणांचा बळी घेणाऱ्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी बुधवारी पाकिस्तान व पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हल्ले केले होते.पाकिस्तानने जम्मू, तसेच पंजाब आणि राजस्थानच्या काही भागांना लक्ष्य करून ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांची मालिका सुरू केल्यानंतर ही सूचना जारी करण्यात आली. बुधवारी उशिरा संध्याकाळपासून जम्मूमध्ये संपूर्ण काळोख होता, नागरिकांनी आकाशात क्षेपणास्त्रांच्या रेषा पाहिल्याचे वृत्त आहे."जम्मूमध्ये पूर्ण काळोख असून, मोठ्याने स्फोट, बॉम्बस्फोट, गोळीबार किंवा क्षेपणास्त्र हल्ल्याचा संशय आहे. घाबरू नका, माता वैष्णवी देवी आणि भारतीय सशस्त्र दलही आपल्यासोबत आहेत," असे जम्मू आणि काश्मीरचे माजी पोलीस महासंचालक शेष पॉल वैद म्हणाले.

### ही 24 विमानतळे राहणार बंद

नागरी उड्डाण मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, चंदीगड, जम्मू आणि काश्मीर, अमृतसर, लुधियाना, भुंटर, किशनगड, पटियाला, शिमला, कांगडा-गग्गल, भटिंडा, जैसलमेर, जोधपूर, बिकानेर, हलवारा, पठाणकोट, जम्मू, लेह, मुंद्रा, जामनगर, हिरासर (राजकोट), पोरबंदर, केशोड, कांडला आणि भुज ही विमानतळे पुढील सूचना मिळेपर्यंत नागरी प्रवासासाठी बंद राहणार आहेत. नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरोने विमानतळांच्या टर्मिनल इमारतीत भेट देणाऱ्यांच्या प्रवेशावर बंदी घातली आणि वाढीव सुरक्षा व्यवस्थेचा भाग म्हणून सर्व उड्डाणांसाठी सुरक्षा तपासणी आणखी कठोर केली आहे.

# पठाणकोटमध्ये पाडलं पाकिस्तानी विमान!

## भारतीय हवाई दलाचा पाकिस्तानला जबरदस्त झटका

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पंजाबमधील पठाणकोट सेक्टरमध्ये काल रात्री भारतीय हवाई दलाच्या संरक्षण यंत्रणेने पाकिस्तानी हवाई दलाचे एक विमान पाडले आहे. तत्पूर्वी, संरक्षण सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतीय लष्कराने जम्मू आणि काश्मीरच्या नौशेरा सेक्टरमध्ये दोन पाकिस्तानी ड्रोन पाडले. या भागात भारतीय आणि पाकिस्तानी सैन्यात झालेल्या चकमकीदरम्यान ही घटना घडली. याबाबत शुक्रवारी अनेक सूत्रांनी एएनआयला माहिती दिली आहे. दरम्यान याबाबत सरकारकडून अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.**



पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय सीमेजवळ असलेल्या जम्मू, पठाणकोट आणि उधमपूर येथील लष्करी तळांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला. पण, भारतीय सशस्त्र दलांनी या हल्ल्याला यशस्वीरित्या प्रत्युत्तर दिले. यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही.सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील एका पोस्टमध्ये, हेडक्वार्टर इंटिग्रेटेड डिफेन्स स्टाफने म्हटले की,"जम्मू आणि काश्मीरमधील आंतरराष्ट्रीय सीमेजवळील जम्मू, पठाणकोट आणि उधमपूर येथील लष्करी तळांवर पाकिस्तानने क्षेपणास्त्रे आणि ड्रोन वापरून हल्ला केला. मात्र, यामध्ये कोणतेही नुकसान झालेले नाही. भारतीय सशस्त्र दलांनी या पाकिस्तानी हल्ल्याचा धोका निष्प्रभ केला."दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी सर्व सीमा सुरक्षा दलांच्या महासंचालकांसोबत भारताच्या सीमेवरील सध्याच्या सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. पाकिस्तानने जम्मू आणि राजस्थानसह भारतीय प्रदेशांवर मोठ्या प्रमाणात ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ला केल्यानंतर भारतीय सैन्याच्या तयारीचे मूल्यांकन करण्यावर या बैठकीत भर देण्यात आला. समावेश होता. येणाऱ्या सर्व क्षेपणास्त्रांना भारतीय हवाई संरक्षण प्रणालींनी रोखले आणि कोणतेही मोठे नुकसान झाले नाही.

### कोणतीही जीवितहानी झाली नाही

एका वेगळ्या बैठकीत, गृहमंत्र्यांनी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या महासंचालकांसोबत भारतातील विमानतळांवरील सुरक्षेचा आढावा घेतला, कारण प्रमुख पायाभूत सुविधांच्या ठिकाणी अतिदक्षता वाढवण्यात आली आहे. भारताने ७ मे रोजी "ऑपरेशन सिंदूर" लाँच केल्यानंतर या घटना घडल्या आहेत. या कारवाईचा एक भाग म्हणून, भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तान व पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळांवर क्षेपणास्त्र हल्ले केले. पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय सीमेजवळ असलेल्या जम्मू, पठाणकोट आणि उधमपूर येथील लष्करी तळांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला. पण, भारतीय सशस्त्र दलांनी या हल्ल्याला यशस्वीरित्या प्रत्युत्तर दिले. यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# ‘कलर्स मराठी’चा लोकप्रिय नायक लग्नबंधनात अडकणार

यंदाच्या वर्षात अनेक मराठी कलाकारांनी लग्नगाठ बांधत आपल्या नव्या आयुष्याला सुरुवात केल्याचं पाहायला मिळालं. आता लवकरच छोट्या पडद्यावरील आणखी अभिनेता विवाहबंधनात अडकणार आहे. ‘कलर्स मराठी’ची लोकप्रिय मालिका ‘अबीर गुलाल’मध्ये या अभिनेत्याने प्रमुख भूमिका साकारली होती. या अभिनेत्याचं नाव आहे अक्षय केळकर. अक्षयच्या घरी आता लग्नाआधीच्या विधींना सुरुवात झालेली आहे. अक्षय आणि साधना यांचा मेहंदीसोहळा नुकताच पार पडला होता. आता दोघांनाही हळद लागली आहे. याशिवाय अभिनेत्याच्या घरी ग्रहमख विधी सुद्धा संपन्न



झाला आहे. अक्षय आता लवकरच त्याची गर्लफ्रेंड साधना काकटकरबरोबर लग्न करणार आहे. हे दोघेही जवळपास १० वर्षे रिलेशनशिपमध्ये होते. अक्षयच्या घरी हळदी समारंभाला दणक्यात सुरुवात झाली असून, मराठी सिनेविश्वातील अनेक कलाकार अक्षयच्या हळदीला पोहोचले आहेत. हळदी समारंभातील काही व्हिडीओ अभिनेत्याने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. यामध्ये प्रथमेश परब, समृद्धी केळकर यांसारखे लोकप्रिय कलाकार अक्षयच्या हळदीला पोहोचल्याचं पाहायला मिळत आहे.

# एअरपोर्टवर दिसली कियारा अडवाणी

कियारा अडवाणी नुकतीच मुंबई विमानतळावर दिसली. यादरम्यान सोशल मीडियावर एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये ती पिवळ्या सलवार कुर्तामध्ये दिसत आहे. कियाराने हा लूक मॅचिंग कोल्हापुरींसोबत जोडला आणि तिचे केस मोकळे सोडले. किमान मेकअप आणि काजलमध्ये अभिनेत्री खूपच सुंदर दिसत होती. कियाराचा हा साधा आणि सोबर लूक चाहत्यांना खूप आवडला. व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले - मला तिचा कुर्ता खूप आवडला, ती किती सुंदर दिसते. दुसऱ्याने लिहिले - सुंदर कियारा. तिसऱ्याने लिहिले, 'माझी सर्वात आवडती अभिनेत्री. ती खूप सुंदर आहे, माझं तिच्यावर प्रेम आहे'. कियारा अडवाणी लवकरच साऊथ सुपरस्टार राम चरणसोबत आगामी तेलुगू चित्रपट गेम चेंजरमध्ये दिसणार आहे. या चित्रपटाद्वारे ती 5 वर्षांनंतर साऊथ इंडस्ट्रीत कमबॅक करत आहे. विनया विंध्य रामा हा तिचा शेवटचा तेलुगु चित्रपट होता जो 5 वर्षांपूर्वी प्रदर्शित झाला होता. या चित्रपटातही ती राम चरणच्या सोबत दिसली होती. याशिवाय कियारा हृतिक रोशन आणि ज्यूनियर एनटीआर यांच्यासोबत ॲक्शन थ्रिलर चित्रपट वॉर 2 मध्ये देखील मुख्य भूमिकेत आहे. कियारा अखेरची सत्यप्रेम की कथामध्ये कार्तिक आर्यनसोबत दिसली होती.





# साधी राहणी हेच खरे भारतीयत्व

कंगना रणौतने 'इस्रो'मध्ये काम करणाऱ्या महिला वैज्ञानिकांचे कौतुक केले आहे. चांद्रयान-3 मोहिमेवर काम करणाऱ्या महिला वैज्ञानिकांच्या साधेपणाने कंगना प्रभावित झाली आहे. बिंदी, सिंदूर आणि गळ्यात मंगळसूत्र घालून या शास्त्रज्ञांनी एवढं मोठं मिशन पूर्ण केल्याचे ती म्हणाली. या महिला शास्त्रज्ञांमध्ये भारताची सभ्यता आणि संस्कृती संहिताबद्ध असल्याचे यावरून दिसून येते. या महिला वैज्ञानिक साधी राहणी आणि उच्च विचारसरणीचे प्रतीक असल्याचे कंगनाने सांगितले. या महिला वैज्ञानिकांचा फोटो इंस्टाग्रामवर शेअर करत कंगनाने लिहिले - भारतातील आघाडीच्या शास्त्रज्ञांकडे पहा, प्रत्येकीने साडी नेसली आहे, कपाळावर बिंदी-सिंदूर आहे. मंगळसूत्रही घातलं जातं. ही साधी राहणी उच्च विचारसरणीचे प्रतीक आहे. हे खरे भारतीयत्व आहे. कंगनाने सोबत राष्ट्रध्वजासह एक इमोजी देखील लावला आहे. आजची आधुनिक पिढी साडी नेसणे, बिंदी, मंगळसूत्र घालणे याला मागासलेली मानसिकता म्हणते. पाश्चिमात्य कपडे घालणाऱ्यांची विचारसरणी आधुनिक आहे, असे त्यांना वाटते, जरी तसे नाही. कपड्यांचा आणि विचाराचा काहीही संबंध नसतो हे या महिला शास्त्रज्ञांनी सिद्ध केले. या महिलांनी एक काम केले आहे ज्यासाठी असामान्य प्रतिभा आवश्यक आहे. 23 ऑगस्ट रोजी संध्याकाळी 6:04 वाजता चांद्रयान-3 च्या लँडरने चंद्रावर पहिले पाऊल ठेवले. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की चांद्रयान-3 बनवण्यासाठी फक्त 615 कोटी रुपये खर्च झाले आहेत. लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे आदिपुरुषाचे बजेट जवळपास सारखेच होते. त्याचे बजेटही अनेक हॉलिवूड चित्रपटांपेक्षा कमी होते. हॉलीवूडमधील स्पेस जॉनर चित्रपटांचे बजेट साधारणपणे 500 कोटींपेक्षा जास्त असते.



# लॉरेन गॉटलीब उरकला साखरपुडा!

अमेरिकन डान्सर आणि लोकप्रिय अभिनेत्री लॉरेन गॉटलीब ही सोशल मीडियावर तिच्या बोल्ड लूकमुळे चर्चेत आहे. 'ABCD: ANY BODY CAN DANCE' या बॉलिवूड चित्रपटात तिने काम केले आणि आपल्या नृत्याने भारतात लोकप्रियता मिळवली. काही काळापूर्वी ती भोजपुरी सुपरस्टार पवन सिंगसोबत 'कमरिया हिला राही है' गाण्यामुळे चर्चेत आली आहे. तिने अनेक चित्रपटामध्येही आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. आता लॉरेन तिच्या चाहत्यांसोबत आनंदाची बातमी शेयर केली आहे. तिने तिच्या प्रियकर टोबियास जोन्ससोबत एंगेजमेंट केली आहे. त्याचे फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. तिच्या प्रियकरासाठी ती लिहिते की, "टोबियास, तू माझ्या स्वप्नांचा राजा आहेस! मला नेहमीच माहित होते की तेथे एक माणूस आहे जो खुप उत्साही, मजेदार आणि तितकाच प्रेमळ, दयाळू, काळजी घेणारा आणि तितकाच सहनशील आहे. या सर्व गोष्टींसोबत बरंच काही! मला लॉस एंजेलिस ते लंडन दरम्यान आलेल्या पहिल्या फोन कॉलनंतरच जाणवलं की आपण एकमेकांच्या आयुष्यात असायला हवं. त्या दीड वर्षात आम्ही प्रेम आणि आदराचा उत्तम पाया बांधला.

# भारताच्या कारवाईमुळे पीएसल रद्द!

## करांची आणि पेशावर यांच्यातील सामन्याबाबत पीबीसीचा निर्णय

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पाकिस्तानमध्ये सध्या पाकिस्तान सुपर लीगचे सामने खेळवले जात आहेत. यादरम्यान भारत-पाकिस्तानमध्ये तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. भारतीय लष्कराने पहलगाममधील पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याचा बदला घेतला आहे. बुधवारी, ७ मे रोजी, भारतीय सैन्याने पाकिस्तान आणि पीओकेमधील ९ दहशतवादी अड्डयांवर हवाई हल्ला केला. यानंतर पाकिस्तानच्या कुरघोडींवर भारतही चोख उत्तर देत आहे. यामुळे आता पीएसएलचा सामना रद्द करण्यात आला.**




भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर करत पहलगाम हल्ल्याचं पाकिस्तानला उत्तर दिलं. या मोहिमेअंतर्गत, भारतीय हवाई दलाने पाकिस्तानातील दहशतवादी तळांना मोठ्या प्रमाणात उद्ध्वस्त केले. भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरचा परिणाम पाकिस्तानमध्ये होणाऱ्या पीएसएलवरही दिसून येत आहे."पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने सर्व भागधारकांशी सल्लामसलत करून, आज रात्री पेशावर झाल्मी आणि कराची किंग्ज यांच्यातील एचबीएल पीएसएल एक्स सामना पुन्हा दुसऱ्या दिवशी आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. पीसीबी योग्य वेळी सुधारित तारीख जाहीर करेल," असे क्रिकेट बोर्डाने एका मीडिया निवेदनात म्हटले आहे.गुरुवारी, मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यातील इंडियन प्रीमियर लीग सामन्याच्या ठिकाणातही बदल करण्यात आला, तर ११ मे रोजी धरमशाला येथे होणारा सामना अहमदाबाद येथे हलवण्यात आला आहे. पाकिस्तानमधील लष्करी कारवाईच्या पार्श्वभूमीवर धरमशाला येथील विमानतळ बंद करण्यात आले आहे. त्यामुळे संघांच्या प्रवासावर याचा परिणाम होणार असल्याने सामन्याचे ठिकाण बदलले आहे. २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवाद्यांच्या तळांवर केलेल्या लष्करी हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर धरमशाला येथील विमानतळ किमान १० मे पर्यंत व्यावसायिक उड्डाणांसाठी बंद करण्यात आले आहे.

गुरुवारी धरमशालामध्ये पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना होत आहे. धरमशालामधील विमान वाहतूक बंद असल्याने पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स संघ कसे प्रवास करणार यावर सर्वांच्या नजरा असणार आहेत. चंदीगड विमानतळ देखील बंद असल्याने, संघांना दिल्लीला जाण्यासाठी मार्ग शोधावा लागेल.भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर करत पहलगाम हल्ल्याचं पाकिस्तानला उत्तर दिलं. या मोहिमेअंतर्गत, भारतीय हवाई दलाने पाकिस्तानातील दहशतवादी तळांना मोठ्या प्रमाणात उद्ध्वस्त केले. भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरचा परिणाम पाकिस्तानमध्ये होणाऱ्या पीएसएलवरही दिसून येत आहे.

"पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने सर्व भागधारकांशी सल्लामसलत करून, आज रात्री पेशावर झाल्मी आणि कराची किंग्ज यांच्यातील एचबीएल पीएसएल एक्स सामना पुन्हा दुसऱ्या दिवशी आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. Zपीसीबी योग्य वेळी सुधारित तारीख जाहीर करेल," असे क्रिकेट बोर्डाने एका मीडिया निवेदनात म्हटले आहे.गुरुवारी, मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यातील इंडियन प्रीमियर लीग सामन्याच्या ठिकाणातही बदल करण्यात आला.

### दिल्लीला जाण्यासाठी मार्ग शोधावा

, तर ११ मे रोजी धरमशाला येथे होणारा सामना अहमदाबाद येथे हलवण्यात आला आहे. पाकिस्तानमधील लष्करी कारवाईच्या पार्श्वभूमीवर धरमशाला येथील विमानतळ बंद करण्यात आले आहे. त्यामुळे संघांच्या प्रवासावर याचा परिणाम होणार असल्याने सामन्याचे ठिकाण बदलले आहे. २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवाद्यांच्या तळांवर केलेल्या लष्करी हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर धरमशाला येथील विमानतळ किमान १० मे पर्यंत व्यावसायिक उड्डाणांसाठी बंद करण्यात आले आहे.गुरुवारी धरमशालामध्ये पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना होत आहे. धरमशालामधील विमान वाहतूक बंद असल्याने पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स संघ कसे प्रवास करणार यावर सर्वांच्या नजरा असणार आहेत. चंदीगड विमानतळ देखील बंद असल्याने, संघांना दिल्लीला जाण्यासाठी मार्ग शोधावा लागेल.

# पंजाब-दिल्ली सामना अचानक रद्द

## खेळाडूंना सुरक्षित ठिकाणी आणण्यासाठी ट्रेनची व्यवस्था

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आयपीएल २०२५ मध्ये पंजाब किंग्स वि. दिल्ली कॅपिटल्स सामना धरमशाला येथे खेळवला जात होता. पण टेक्निकल आणि सुरक्षेच्या कारणामुळे हा सामना रद्द करण्यात आला. जम्मू काश्मीर आणि आजूबाजूच्या परिसरात रेड अलर्ट दिल्याने ब्लॅक आऊट करण्यात आल्याने सामना थांबवला गेला. दरम्यान आता खेळाडूंच्या सुरक्षेचा प्रश्न उभा राहिला आहे.**




संघाचे खेळाडू आणि सपोर्ट स्टाफला सुरक्षित ठिकाणी परत आणण्यासाठी योजना आखली आहे. यासाठी स्पेशल ट्रेनची व्यवस्था करण्यात आली आहे. रिपोर्ट्सच्या मते, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने खेळाडूंसाठी एक विशेष ट्रेनची व्यवस्था केली आहे आणि खेळाडूंना धरमशाला शहरातून इतर ठिकाणी आणले जाईल.पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्सच्या खेळाडूंना धर्मशाळाहून उना येथे नेले जाईल. उना येथून एक विशेष ट्रेन निघेल जिथून खेळाडूंना दिल्लीला आणता येईल. दोन तुकड्यांच्या माध्यमातून खेळाडू, सपोर्ट स्टाफ आणि मॅच ऑफिशियल्स या ट्रेनद्वारे दिल्लीकडे रवाना होतील. पंजाब किंग्ज फलंदाजी करत असताना ११ व्या षटकात हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशन स्टेडियममधील एक फ्लडलाइट टॉवर बंद झाला. चाहत्यांना तांत्रिक बिघाड असल्याचा संशय आला, परंतु त्यानंतर प्रेक्षकांना स्टेडियम सोडण्यास सांगण्यापूर्वी आणखी दोन फ्लडलाईट बंद झाले. त्यानंतर आयपीएलने त्यांच्या अधिकृत एक्स अकाउंटवर सामना रद्द करण्यात आल्याची घोषणा केली.बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी इंडिया टुडेशी बोलताना सामना रद्द करण्याच्या निर्णयाचे स्पष्टीकरण दिले. सैकिया म्हणाले की बीसीसीआय परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि त्यानुसार पुढील निर्णय घेईल. बीसीसीआय सचिव म्हणाले, "सध्या परिस्थिती स्थिर नाही आणि म्हणूनच आम्ही आजचा सामना रद्द केला आहे. केवळ धरमशालामधील स्थितीमुळे नाही तर शेजारील देशाकडून वाढत्या तणावामुळे देखील हा सामना रद्द केला आहे."“खेळाडू, प्रेक्षक आणि सपोर्ट स्टाफची सुरक्षा ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. आम्ही राष्ट्राच्या हितासाठी सर्वकाही करू. आम्ही परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहोत.

### राष्ट्राच्या हितासाठी सर्वकाही करू

संघाचे खेळाडू आणि सपोर्ट स्टाफला सुरक्षित ठिकाणी परत आणण्यासाठी योजना आखली आहे. यासाठी स्पेशल ट्रेनची व्यवस्था करण्यात आली आहे. रिपोर्ट्सच्या मते, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने खेळाडूंसाठी एक विशेष ट्रेनची व्यवस्था केली आहे आणि खेळाडूंना धरमशाला शहरातून इतर ठिकाणी आणले जाईल.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार।
। दि. 9 मे 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## कुदळवाडीतील धार्मिक स्थळांच्या”

# "डिमॉलिशन" ला तूर्तास स्थगिती!

### कायदेशीर प्रक्रिया झाल्याशिवाय मंदिर आणि मस्जिदींना हात लावणार नाही!

### शहर अभियंता मकरंद निकम यांची ॲड. असीम सरोदे यांना ग्वाही



**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**चिखली-कुदळवाडी येथील धार्मिक स्थळांना ‘अतिक्रमण’ असे लेबल लावून दिलेल्या नोटिसेस एकतर्फी, कायद्याची प्रक्रिया न करता व सर्वोच्च न्यायालयाने सांगिलेली प्रक्रिया पूर्ण करावी, असे मत ॲड. असीम सरोदे यांनी मांडले. यावर कायदेशीर प्रक्रिया झाल्याशिवाय ‘पीसीएमसी’ कुदळवाडीमधील मंदिर आणि मस्जिदींना हात लावणार नाही, अशी ग्वाही मुख्य अभियंता मकरंद निकम यांनी दिली.**

पीसीएमसीचे शहर अभियंता मकरंद निकम यांची ॲड.असीम सरोदे यांनी त्यांच्या सहकारी वकिलांसह पीसीएमसी कार्यालयात भेट घेऊन चर्चा केली. यावेळी ॲड. श्रीया आवले, ॲड. गौतम कुडूक, ॲड. अरहंत धोत्रे, ॲड. प्रशाली काळे, ॲड. राधनी हंबरडे, अस्मा क्षीरसागर उपस्थित होते.महानगरपालिका कायद्याच्या कलम 487 नुसार पीसीएमसी ला नोटीस देणे आवश्यक असल्याने ती प्रक्रिया शहर अभियंता मकरंद निकम यांना नोटीस इमेल द्वारे आणि प्रत्यक्ष देऊन पूर्ण करण्यात आल्याची माहिती ॲड. श्रीया आवले यांनी दिली.

‘आम्ही सुनावणी घेतल्याशिवाय, सगळ्यांचे मत ऐकून घेतल्याशिवाय मस्जिदींच्या विरोधात डिमॉलिशन कारवाई करणार नाही, असे पीसीएमसीचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी ॲड. असीम सरोदे यांना सांगितले. यापार्श्वभूमीवर मस्जिदी पाडण्यावर साधारणतः 25 ते 30 दिवसांचा ‘स्टे’ मिळाला आहे असे स्पष्ट झाल्याचे ॲड. असीम सरोदे म्हणाले. आता सगळ्या मंदिर-मस्जिद अश्या धार्मिक स्थळांची पाहणी करणे, त्याबाबत अहवाल तयार करणे, सगळ्यांना सुनावणीसाठी वेळ देणे, त्यानंतर पुढील 15 दिवस न्यायालयात जाण्यासाठी वेळ देणे अशी सर्वोच्च न्यायालयाने सांगितलेली प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल, असी माहिती ॲड. कुडूक गौतम यांनी दिली.

## पीसीसीओईआर मध्ये ‘हरित इमारत’ विषयावर चर्चासत्र

### विद्यार्थ्यांनी हरित इमारत आणि निसर्ग वाचवण्यासाठी घेतली शपथ

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**



पर्यावरण संरक्षणासाठी यापुढील काळात हरित इमारती बांधणे आवश्यक आहे. हरित इमारत बांधकाम जमीन, सामग्री, ऊर्जा, पाण्याचा कार्यक्षम वापर करते. तसेच यात ऊर्जा कार्यक्षमता वाढ, पाण्याचा पुनर्वापर केला जातो. त्यामुळे हरित इमारती या पर्यावरणपूरक असतात. वास्तू रचनाकार आणि स्थापत्य अभियंता यांनी हरित इमारती बांधणीवर भर दिला पाहिजे असे मत स्प्राउट कन्सुलन्सीच्या संचालक नम्रता धामणकर यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) आणि कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय), इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिल (आयजीबीसी) यांच्या संयुक्त विद्यामानें “इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिलचे उद्दिष्टे आणि हरित इमारत” या विषयावर चर्चासत्र आयोजित केले होते. यावेळी हरित इमारत-रचना, शाश्वत पर्यावरण आणि दृष्टिकोन या विषयावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

यावेळी पीसीसीओईआरचे प्राचार्य डॉ.हरीश तिवारी, आर्किटेक्ट ऋतुराज कुलकर्णी (सहयोगी प्राध्यापक, एसबीपीसीओएडी), आर्किटेक्ट ऋजुता पाठक (समन्वयक, आयजीबीसी स्टुडंट चॅप्टर व सहयोगी प्राध्यापक, एसबीपीसीओएडी), स्थापत्य अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुदर्शन बोबडे उपस्थित होते.

आर्किटेक्ट ऋतुराज कुलकर्णी म्हणाले की, हरित इमारती बांधताना संसाधनांचा कार्यक्षम वापर, रहिवाशांच्या आरोग्याचे रक्षण तसेच कचरा, प्रदूषण आणि पर्यावरणाचा ऱ्हास कमी करून मानवी आरोग्यावर, नैसर्गिक पर्यावरणावर विपरीत परिणाम होणार नाहीत याची काळजी घेतली जाते.

प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी शाश्वत पर्यावरणाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकल्याबद्दल पीसीसीओईआर स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे कौतुक केले. कार्यक्रमास स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी शाश्वत, हरित इमारती आणि निसर्ग वाचवण्यासाठी समग्र दृष्टिकोनाची शपथ घेतली. डॉ. सुदर्शन बोबडे यांनी स्वागत केले. प्रा.चेतन चव्हाण यांनी आभार मानले.

ADMISSION OPEN

## Moraya Shikshan Sanstha

"यत् भावो – तत् भवति"

# Computer 15 days Crash Course

## Our Courses

- PowerPoint with animation
- Basic Excel
- Corel Draw
- Adobe Photoshop
- Scratch Animation
- 'C' Language
- Basic Java
- Basic Tally



From

5th May 2025

1 Hour / day

Monday to Saturday

Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292

# पीएचडी मार्गदर्शकांकडून होताहेत गैरव्यवहार!

## आमदार शंकर जगताप: विधानसभेत राज्य सरकारचे लक्ष वेधले!

| पिंपरी | प्रतिनिधी : महाईन्यूज |

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएचडी मार्गदर्शक आणि सांगवी येथील बाबुराव घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापिकेने पीएचडी विद्यार्थ्यांकडून लाच घेतल्याच्या प्रकरणावर विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा झाली. आमदार शंकर जगताप यांनी या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना प्रश्न विचारले. पीएचडी मार्गदर्शकांकडून होणारे गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर उयोययोजना करावी, अशी आग्रही मागणी आमदार जगताप यांनी केली.**



आमदार शंकर जगताप यांनी विचारलेल्या प्रश्नांमध्ये संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेसह, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील नियंत्रण, विद्यार्थ्यांची गैरसोय, आणि पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर सरकारने कोणती पावले उचलली आहेत, या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश होता.

या प्रश्नांना उत्तर देताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेची घटना खरी असल्याचे मान्य केले. मात्र, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवर नियंत्रण नसल्याने विद्यार्थ्यांची छळवणूक होते, हा आरोप फेटाळला. तसेच, संशोधन केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचा मुद्दाही त्यांनी नाकारला. पुढील उपाययोजनांबाबत माहिती देताना मंत्रीमहोदय म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर 'पीएचडी ट्रॅकिंग प्रणाली' कार्यान्वित करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणींबाबत तक्रार नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच, विद्यापीठाकडून सर्व संशोधन केंद्रांचे शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक सोयीसुविधा पुरवणे हे संशोधन केंद्रांना बंधनकारक करण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाच्या चौकशीसंदर्भात विद्यापीठाने आवश्यक ती माहिती संकलित केली असून, शासनस्तरावरही कार्यवाही करण्यात येत असल्याचे चंद्रकांतदादा पाटील यांनी सभागृहात सांगितले. या चर्चेदरम्यान, पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील देखरेख अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे आमदारांनी अधोरेखित केले.